# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५

गोविग / विद्या / क्र/१६८७/ २०२६ दि. ०७/०५/२०२६

## परिपत्रक

**संदर्भ:-१) मा. व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या गठीत समितीची सभा दि.०६/०३/२०२६.**
**२) विद्या विभागाचे पत्र क्र. गो.वि/१५६९/ २०२६ दि.०९/०३/२०२६.**
**३) मा. संस्थाध्यक्ष व मा.प्राचार्य यांची सयुक्त सभा दि.१३/०३/२०२६**
**४) मा.अधिसभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) चे केंद्र असलेले गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, संदर्भ क्र.३ नुसार दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी मा.कुलगुरू महोदय यांच्या अध्यक्षतेखाली मा.संचालक व प्राचार्य यांची सयुक्त सभा संपन्न झलेली होती. सदर सभेमध्ये गोंडवाना विद्यापीठातील प्रवेशीत संख्या वाढावी याकरीता सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच संदर्भ क्र.४ नुसार चर्चेअंती यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) चे केंद्र असलेल्या महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

- जे विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित आहेत, तसेच जे विद्यार्थी नोकरी करीत आहे अशाच विद्यार्थ्यांची कागदपत्राची तपासणी करुन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) मध्ये प्रवेश निश्चित करावा.
- महाविद्यालयांचे Affiliation गोंडवाना विद्यापीठाच्या अंतर्गत झालेले आहे. त्यामुळे संस्थाध्यक्ष व प्राचार्यांना महाविद्यालयांची विद्यार्थीसंख्या कशी वाढवता येईल? याकडे लक्ष दयावे ज्यामुळे विद्यार्थीसंख्येतील होणारी घट कमी करता येईल.
- जे विद्यार्थी नियमीत असुन १२ वी उत्तीर्ण झाले असतील अश्या विद्यार्थ्यांना प्रथमत: गोंडवाना विद्यापीठामध्ये प्रवेश दयावा. गोंडवाना विद्यापीठामध्ये प्रवेशक्षमता पूर्ण झाल्यावरच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.
- सर्व महाविद्यालयाने गोंडवाना विद्यापीठाचे Affiliation घेतलेले असल्यामुळे कमी विद्यार्थी संख्येमुळे शिक्षक हे अतिरीक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच गोंडवाना विद्यापीठाचे Affiliation घेतेवेळी महाविद्यालयाचे Infrastructure हे फक्त गोंडवाना विद्यापीठाकरीता वापरण्यात येईल असे बंधन असतांना सुध्दा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) करीता सदर संसाधने वापरणे योग्य होणार नाही.
- २०२६-२७ या शैक्षणिक सत्रामध्ये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांनी गोंडवाना विद्यापीठातील प्रवेश क्षमता वाढविण्याकरीता वरील उपाययोजना करावे, अन्यथा गोंडवाना विद्यापीठाशी सलग्नीत महाविद्यालयात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
- गोंडवाना विद्यापीठाशी सलग्नीत महाविद्यालयाने OJT ची प्रभावी अंमलबजावणी करावे तसेच डीजीटल क्लासरूम विकसीत करण्यासाठी प्रयत्न करावे.
- मुक्त विद्यापीठाच्या परिक्षा केंद्रावर भरारी पथकामध्ये जाणारे प्राध्यापक हे गोंडवाना विद्यापीठाशी सलग्नीत महाविद्यालयातील असल्याने त्यांनी मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा केंद्रावरील होणारी कॉपी पुर्णपणे बंद करण्यास प्रयत्न करावे.

उक्त सुचनाचे काटेकोरपणे अमंलबजावणी करावी हि विनंती

मा. कुलगुरू महोदयांचे आदेशान्वये,

(डॉ. अनिल हिरेखण )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:-**

१) मा.कुलगुरू, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.
२) मा.प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
३) संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागप्रमुख.
४) संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
५) संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.उपरोक्त नुसार परिक्षायोजना व बास्केट संकेतस्थळावर प्रकाशीत करावे.

Scanned with OKEN Scanner